**<u>नवी मुंबई महानगरपालिका</u>**

**महानगरपालिका सचिव कार्यालय, नवीन मुख्यालय, 3रा मजला, बेलापूर, नवी मुंबई 400614.**

**-: <u>सर्वसाधारण सभेची नोटीस</u> :-**

**दिनांक: 07/02/2017.**

नवी मुंबई महानगरपालिकेची **<u>फेब्रुवारी महिन्याची सर्वसाधारण सभा, बुधवार, दिनांक 15 फेब्रुवारी 2017 रोजी सकाळी 11.00 वाजता</u>** बेलापूर, भुखंड क्रमांक 01, सेक्टर 15ए, नवी मुंबई महानगरपालिका, नवीन मुख्यालय येथील 5 व्या मजल्यावरील **<u>राजमाता जिजाऊ सभागृह</u>** येथे खालील विषयांवर विचार करण्यासाठी भरेल :-

**1.** इतिवृत्त.

**2.** प्रश्नोत्तरे.

**<u>स्थायी समिती मधील ठराव :</u>**

**3.** सन 2015-16 या वर्षाकरिता नवी मुंबई महानगरपालिका अधिकारी/कर्मचाऱ्यांना सानुग्रह अनुदान अदा करणे.

**<u>क्रिडा व सांस्कृतिक कार्यक्रम समिती मधील ठराव :</u>**

4. नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने विविध खेळाचे खेळाडू दत्तक घेवून व्यावसायिक संघ तयार करणे.

**<u>आयुक्तांकडील प्रस्ताव :</u>**

**5.** नवी मुंबई महानगरपालिकेच्या आरोग्य विभागांतर्गत वैद्यकीय अधिकारी / वैद्यकीय तज्ञ यांच्या तात्पुरत्या स्वरूपातील नेमणूकी करणे.

**6.** घणसोली प्र. क्र. 19 निब्बान टेकडी येथील दरड कोसळण्याच्या ठिकाणी आर.सी.सी. संरक्षक भिंत बांधणे.

**7.** विष्णूदास भावे नाट्यगृहातील उपहारगृह चालविणेकरिता देणे.

**8.** अपंगाच्या स्वयंरोजगाराकरीता जागा उपलब्ध करून देणेबाबतचे धोरण ठरविणे.

**9.** नवी मुंबई महानगरपालिका भाजीपाला व फळ मार्केट इमारतीमधील ओटले/गाळे भाडेतत्वावर देणे.

**10.** घणसोली विभागातील दत्तनगर शंकरबुवा वाडी येथील मुख्य रस्त्याची सुधारणा करणे.

**11.** दिघा विभागातील इलठणपाडा येथील स्मशानभूमीची संरक्षण भिंत व दहन शेड बांधणे.

**12.** महापे गांवातील हरीप्रिया हॉटेलपासून अष्टगंध बिल्डींगपर्यंत रस्त्याची सुधारणा करणे.

**13.** कोपरखैरणे सेक्टर 14 येथील निसर्ग उद्यान ते जामा मस्जिद पर्यंत पावसाळी गटर व फूटपाथ बांधणे व रस्त्याची सुधारणा करणे.(Walkability)

**14.** पावणेगांव शिवमंदीर ते गांवदेवी मंदीरपर्यंतच्या रस्त्याची सुधारणा करणे व उर्वरीत स्ट्रॉर्म वॉटर ड्रेन बांधणे व उर्वरीत भागात मलनि:स्सारण वाहिन्या टाकणे.

**15.** बेलापूर विभागातील नेरूळ से.58 अे येथील वनश्री सोसायटी ते अमर सोसायटी दरम्यानच्या रस्त्याची डांबरीकरणाने सुधारणा करणे.

**16.** सी.बी.डी. बेलापूर से.8 बी येथील गिरीकुंज सोसा. ते सेंट्रल बँक ऑफिसर रेसीडन्स बिल्डींग पर्यंत गटार, डक्ट व पदपथ बांधणे.

**17.** वाशी से.05 प्र.क्र. 64 येथील जुन्या राज्य बीमा योजना हॉस्पीटल जवळील गटार व पदपथाची सुधारणा करणे.

**18.** ऐरोली प्रभाग क्र. 13 सेक्टर 3 येथे भारत बिजली ते प्रियंका हॉटेल पर्यंत असलेल्या गटर व पदपथाची सुधारणा करणे.

**19.** ऐरोली प्रभाग क्र. 21 सेक्टर 8अे येथील नविन विकसित झालेल्या भागात गटर व पदपथ बांधणे.

**20.** ऐरोली प्र.क्र.14 सेक्टर 19 येथील भू.क्र.सी-1 ते डॉ.नानासाहेब धर्माधिकारी चौक पर्यंत गटर व पदपथाची सुधारणा करणे.

**21.** ऐरोली विभागातील प्र.क्र. 11 मधील से.20बी जवळील गटर व पदपथाची सुधारणा करणे.

**22.** ऐरोली दिवागांव येथील रस्त्याची व पदपथाची सुधारणा करणे.

**23.** घणसोली विभागातील चिंचआळी येथील अंतर्गत रस्त्याची सुधारणा करणे व आर.सी.सी. ड्रेन बांधणे.

**24.** ऐरोली गांव येथील रस्त्याची सुधारणा करणे.

**25.** दिघा विभागातील गणपतीपाडा येथील स्मशानभुमी अद्यावत करणे.

**26.** कोपरखैरणे प्र.क्र.50 बोनकोडे गांवातील मुख्य रस्त्यालगत हेवी डयुटी स्ट्रॉम वॉटर ड्रेन बांधणे, रस्त्याची सुधारणा करणे, उर्वरीत भागात डी.आय. जलवाहिनी टाकणे व उर्वरीत भागात मलनि:स्सारण वाहिन्या टाकणे व इलेक्ट्रीक पोल शिफ्ट करणे.

**27.** पारसिक हिल बेलापूर से. 23, 24, 26, 27 येथील रस्त्याचे डांबरीकरण करून सुधारणा करणे.

**28.** बेलापूर विभागातील नेरूळ से. 28, 36, 40, 42, 42ए, 46, 46ए, 48, 48ए, 50(प), एन.आर.आय. कॉप्लेक्स 58, 58अे येथील नागरिकांना चालण्यासाठी बॅरीअर फ्री व वॉकेबिलिटी संदर्भातील तत्सम कामे करणे. (फुटपाथ दुरूस्ती, रॅम्प बनविणे, सर्कल करीता ग्रील बसविणे व रंगकाम करणे.)

**29.** वाशी विभागातील कोपरीगांव येथील गांवदेवी मैदान प्लॉट नं. 5 ची सुधारणा करणे.

**30.** दिघा विभाग कार्यालयाचे नुतनीकरण व पुर्नरचना करणे.

**31.** अडवली भुतवली गावातील रस्त्याची सुधारणा करणे व फुटपाथ बांधणे.

**32.** बेलापूर विभागतल सी.बी.डी. से. 1 ते 10 मध्ये नागरिकांना चालण्यासाठी बॅरीअर फ्री व वॉकेबिलिटी संदर्भातील तत्सम कामे करणे. (फुटपाथ दुरूस्ती, रॅम्प बनविणे, सर्कल करीता ग्रील बसविणे व रंगकाम करणे.)

**33.** घणसोली विभागातील कोळ्याची आळी परिसरातील रस्ते, पावसाळी ड्रेन व पदपथांची सुधारणा करणे.

**34.** बेलापूर विभागातील नेरूळ से. 21, 23, 25, 27, आम्र मार्ग, बेलापूर से. 19, 20, 21/22 मध्ये नागरिकांना चालण्यासाठी बॅरीअर फ्री व वॉकेबिलिटी संदर्भातील तत्सम कामे करणे. (फुटपाथ दुरूस्ती, रॅम्प बनविणे, सर्कल करीता ग्रील बसविणे व रंगकाम करणे.)

| | |
|---|---|
| **35.** नवी मुंबई महानगरपालिकेच्या विविध विभागाकरीता संगणक, प्रिंटर, स्कॅनर व इतर संगणकीय साहित्य खरेदी करिता वार्षिक दर करार करणे.<br>**36.** नेरुळ से.26 येथील पामबीचलगत असलेल्या वॉटर बॉडी व सभोवतालच्या परिसराचे सुशोभिकरण करणे.<br>**37.** नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील नळजोडणीधारकांना आकारण्यात येत असलेल्या पाणी दरांचे सरळीकरण, सुसुत्रिकरण व नियमन करणे.<br>**38.** नवी मुंबई महापालिका कार्यक्षेत्रात कोपरखैरणे से. 02 व घणसोली से.04 येथे निराश्रित व शहरी बेघरांसाठी कायमस्वरुपी निवारा केंद्र बांधणे.<br>**39.** कोपरखैरणे विभागात नागरिकांना चालण्यासाठी बॅरीअर फ्री व वॉकेबिलिटी संदर्भातील तत्सम कामे करणे. (फुटपाथ दुरुस्ती, रॅम्प बनविणे, सर्कल करीता ग्रील बसविणे व रंगकाम करणे, इलेक्ट्रीक पोल, फीडर पिलर, एम.टी.एन.एल. बॉक्स शिफ्ट करणे)<br>**40.** ऐरोली विभागात नागरीकांना चालण्यासाठी बॅरिअर फ्री व वॉकेबिलिटी संदर्भातील तत्सम कामे करणे. (फुटपाथ दुरुस्ती, रॅम्प बनविणे, चौकात ग्रील बसविणे व एफ आर पी कव्हर्स बसविणे)<br>**41.** दिघा विभागात नागरिकांना चालण्यासाठी बॅरीअर फ्री व वॉकेबिलिटी संदर्भातील तत्सम कामे करणे. (फुटपाथ दुरुस्ती, रॅम्प बनविणे, ग्रील बसविणे व रंगकाम करणे, इलेक्ट्रीक पोल, फीडर पिलर शिफ्ट करणे)<br>**42.** नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या जलवाहिनीवरुन थेट पाणी पुरवठा होणा-या भागासाठी महापे ते दिघा जलवाहिनी टाकणे.<br>**43.** भु.क्र. 41 से. 10 सानपाडा येथे उद्यानासाठी असलेल्या राखीव भूखंडावर उद्यान विकसित करणे.<br>**44.** ऐरोली विभाग कार्यालयाची सुधारणा व नुतनीकरण विषयक स्थापत्य कामे करणे.<br>**45.** घणसोली विभागातील घणसोली खाडीलगत असलेल्या मलवाहिन्यांची जोडणी सेक्टर-15 मलप्रक्रिया केंद्राकडे जाणाऱ्या मुख्य मलवाहिनीस करणे.<br>**46.** सेक्टर क्र. 50, नेरूळ (प) येथील नवी मुंबई महानगरपालिका शाळा इमारत बॅरिअर फ्री करणे.<br>**47.** ऐरोली प्र.क्र. 23 मधील दिवागांव स्मशानभुमी अद्यावत करणे.<br>**48.** सी.बी.डी. बेलापूर येथील आग्रोळी तलावाची सुधारणा करणे.<br>**49.** ठाणे-बेलापुर रस्त्यावर नागरिकांना चालण्यासाठी बॅरीअर फ्री व वॉकेबिलिटी संदर्भातील तत्सम कामे करणे. (फुटपाथ बांधणे, पावसाळी ड्रेन बांधणे, रंगकाम करणे.)<br>**50.** कोपरखैरणे विभाग कार्यालयाचे नुतनीकरण करणे.<br>**51.** नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रासाठी लागु असलेल्या विकास नियंत्रण नियमावलीमध्ये महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 37 (1) अन्वये फेरबदल करणे.<br>**52.** घणसोली विभाग कार्यालयाचे नुतनीकरण करणे. | **53.** बेलापूर विभागातील नेरूळ से.50 येथील गंगाराम शेठ तांडेल चौक ते श्रीविनायक सी.एच.एस. आणि जुही लॉन सोसायटी येथील रस्त्याची सुधारणा करणे, फुटपाथची सुधारणा करणे आणि युटीलीटी डक्ट बांधणे.<br>**54.** वाशी विभागातील सेक्टर 17 येथील मुख्य चॅनेलवर बायोरेमिडिएशन ट्रिटमेंट करणे.<br>**55.** अग्निशमन विभागातील अधिकारी / कर्मचारी यांना सन 2016-2017 साठी गणवेश व इतर आवश्यक साहित्य पुरवठा करणे.<br>**56.** नवी मुंबई महानगरपालिका अग्निशमन विभागासाठी विविध प्रकारचे रेस्क्यु साहित्य खरेदी करणे.<br>**57.** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम 59(अ) नुसार अधिकाऱ्यांवर किंवा कर्मचाऱ्यांविरूध्द खटला भरण्याच्या कार्यवाहीची मंजूरी दिलेबाबत मा.महासभेस अवगत करणे.<br>**58.** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम 56(1)(ब) च्या तरतूदीनुसार कलम 45 खाली नियुक्त करण्यात आलेल्या सहाय्यक आयुक्त या संवर्गातील अधिकाऱ्यांस निलंबीत केलेबाबत मा.महासभेस अवगत करणे.<br>**59.** नवी मुंबई महानगरपालिकेच्या मालकीच्या इमारतीत हाउसकिपींगची कंत्राटी कामे करणे<br>**60.** नमुंमपाच्या विविध विभागाच्या दैनंदिन कामाकरिता इन्टेग्रेटेड इंटरप्राईज सोल्यूशन विकसित करणे.<br>**61.** नवी मुंबई महानगरपालिका अंतर्गत सर्व रूग्णालयांकरीता सन 2017-18 करीता आवश्यक श्वानदंश लस खरेदी करणे.<br>**62.** नवी मुंबई महानगरपालिकेच्या सार्वजनिक रूग्णालय वाशी येथील आंतररूग्णांना भोजनपुरवठा करणे व उपहारगृह चालविणे.<br>**63.** तुर्भे विभागात नागरीकांना चालण्यासाठी बॅरिअर फ्री व वॉकेबिलिटी संदर्भातील तत्सम कामे करणे. (फुटपाथ दुरूस्ती, रॅम्प बनविणे, चौकात ग्रील बसविणे व एफ आर पी कव्हर्स बसविणे)<br>**64.** तुर्भे विभागातील सेक्टर 22 येथे गुप्ता वजन काटा, ॲपेटाईट हॉटेल चौक ते अशोक सहकारी संस्था पर्यंत रस्त्याचे काँक्रिटीकरण व डांबरीकरण करणे.<br>**65.** तुर्भे विभागातील सेक्टर-22, 23 व 24 येथे रस्ता, पावसाळी ड्रेन व पदपथाची सुधारणा करणे.<br>**66.** तुर्भे विभागातील सानपाडा येथील नागरीकांना चालण्यासाठी बॅरिअर फ्री व वॉकेबिलिटी संदर्भातील तत्सम कामे करणे. (फुटपाथ दुरूस्ती, रॅम्प बनविणे, चौकात ग्रील बसविणे व एफ आर पी कव्हर्स बसविणे).<br>**67.** कंत्राटी कामगारांना किमान वेतन अदा करणे.<br>**68.** नमुंमपा कार्यक्षेत्रातील अनधिकृत तब्येल्यांचे नियंत्रण व नियमन करणे.<br>**69.** कोपरखैरणे सेक्टर 22 येथील माता बाल संगोपन केंद्राच्या इमारतीची दुरुस्ती व नुतनीकरण करणे. |

**70.** नवी मुंबई महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील आरोग्य विभागाअंतर्गत वैद्यकिय अधिकारी वेतनश्रेणी 15600-39100 ग्रेड वेतन रू.5400/- व त्यावरील संवर्गातील अधिकाऱ्यांचे सेवानिवृत्तीचे वय 58 वर्षे वरून 60 वर्षापर्यंत वाढविणेस मान्यता मिळणे.

**71.** नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र, जोता तपासणी प्रमाणपत्र व भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त करून न घेता वापर सुरू केलेल्या तथापि, नियमित करता येणाऱ्या बांधकामासंदर्भात प्राप्त झालेल्या प्रस्तावांवर दंडात्मक समायोजन शुल्काची आकारणी करणे.

**72.** नेरूळ शिरवणे गांव व से.1ए येथील गटर व पदपथ व रस्ते, क्रॉस डक्ट सहित सुधारणा करणे व उर्वरित भागात डी.आय.जलवाहिनी टाकणे.

**73.** तुर्भे विभागातील सानपाडा से. 2, 3, 4 येथे रस्ता, पावसाळी ड्रेन व पदपथाची सुधारणा करणे.

**74.** पामबीच मार्गाची किल्ला जंक्शन ते वाशी से. 17 सिग्नल पर्यंत मायक्रो सर्फेसिंग लेयर टाकून सुधारणा करणे.

**75.** नेरूळ विभागातील भूखंड क्र.51 (शिरवणे फाटा जवळ) ते तुर्भे उड्डाणपुल पर्यंत रस्त्याची डांबरीकरणाने सुधारणा करणे व पदपथ बांधणे.

**76.** नेरूळ जुईनगर से.23 जुईपाडा गावामधील गटर व पदपथाची क्रॉस डक्ट सहित सुधारणा करणे.

**77.** नेरूळ विभागातील नागरीकांना चालण्यासाठी बॅरीअर फ्रि फुटपाथ व Walkability संदर्भातील तत्सम कामे करणे. (उदा. रॅम्प, झेब्रा, बोलार्ड, बोर्ड, सर्कल करीता / डिव्हायडर करीता ग्रील बसविणे).

**78.** सानपाडा से. 13, 16ए व 20 येथे रस्ता, पावसाळी ड्रेन व पदपथाची सुधारणा करणे.

**79.** वाशी विभागातील जुहूगांव येथे उर्वरित ठिकाणी मलनि:स्सारण वाहिन्या टाकणे, गटार बांधणे, रस्त्याची व पदपथांची सुधारणा करणे.

**80.** नेरूळ सारसोळे सेक्टर-2 स्मशानभूमी येथे पी.एन.जी.शवदाहिनी बांधणे.

**81.** वाशी विभागातील कोपरीगांव येथे उर्वरीत ठिकाणी मलनि:स्सारण वाहिन्या टाकणे, गटर बांधणे व पदपथांची सुधारणा करणे.

**82.** सी.बी.डी. सेक्टर 19/20, भूखंड क्र.एम.बी.जी.-1 येथील दफनभूमी "व्यवस्थापन व परिचलनाकरीता" वाटपीत करणे.

**83.** तुर्भे विभाग कार्यालयाची सुधारणा करणे.

**84.** वाशी विभागात नागरिकांना चालण्यासाठी बॅरियर फ्री व वॉकेबिलीटी संदर्भातील तत्सम कामे करणे. (फुटपाथ दुरुस्ती, रॅम्प बनविणे, सर्कल करीता ग्रील बसविणे व रंगकाम करणे.(Walkability)).

**85.** करावे स्मशानभुमी येथे पी एन जी शवदाहिनी बांधणे.

**86.** नवी मुंबई महानगरपालिका प्रभागनिहाय हागणदारी मुक्त जाहिर केल्याची माहिती सादर करणे.

**87.** नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात जैविक विविधता व्यवस्थापन समिती स्थापन करणे.

**88.** नवी मुंबई महानगरपालिकेच्या विविध विभागांना आवश्यक असलेली छापील रजिस्टर्स फॉमर्स व पावती पुस्तके यांची छपाई करणेकरिता दरकरार करणे.

**89.** कोपरखैरणे क्षेपणभुमीवरील भंगार सामानाची विक्री करण्यासाठी निविदा मागविणे.

**<u>ठरावाच्या सूचना</u> :**

**90 ते 92. श्री. हरिश्चंद्र आत्माराम भोईर, यांजकडून :-**

**(90)** प्र.क्र. 59, सेक्टर 11, जुहूगांव येथील स्वामी नारायण मंदिर ते जुहूगांव स्मशानभूमी पर्यंत वृक्षपट्टा (Tree belt) विकसित करणे. सदर ठिकाणी उद्यान विकसित करून लहान मुलांसाठी खेळणीघर व ज्येष्ठ नागरिकांसाठी विरंगुळा केंद्र बांधणे. **(91)** प्र.क्र. 59, सेक्टर 11, वाशी नवी मुंबई येथील हिमबिंदू सोसायटी समोर असलेल्या भूखंडावर लग्नकार्यासाठी व इतर विधीकार्यासाठी आगरी-कोळी भवन उभारणे. **(92)** प्र.क्र. 59, सेक्टर 11 वाशी, नवी मुंबई गावदेवी मैदान येथील आनंद भवन सोसायटी ते कोळीनबाई निवास (साईदिप बिल्डींग) येथील कमी व्यासाच्या मलनि:स्सारण वाहिन्या बदलून तेथे मोठ्या व्यासाच्या मलनि:स्सारण वाहिन्या टाकणे व तेथील फुटपाथची सुधारणा करणे व तेथे इंटरब्लॉक बसविणे.

**93. श्री. रामचंद्र बारशा घरत, यांजकडून :-**

नवी मुंबईतील अनिवासी मालमत्ताना पाण्याचे कनेक्शन देण्यात आले नसतानाही पाणी बिल सरसकट आकारले जाते. सदर कर हा जिझीया स्वरूपात असून नागरीकांची ससेहोलपट होत आहे. तरी सदर अनिवासी मालमत्ताना आकारले जाणारे पाणी बिल रद्द करणे.

**94 ते 96. श्री. रंगनाथ कारभारी औटी, यांजकडून :-**

**(94)** प्र.क्र. 84 मधील से. 2 व 4 येथील उद्यानात व मुख्य चौकात सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बसविणे. **(95)** प्र.क्र. 84 मधील से. 2 व 4 मधील गार्डनमध्ये अत्याधुनिक खेळणी, बँचेस व कारंजे बसविणे. **(96)** प्र.क्र. 84 मधील से. 2 येथील शिरवणे विद्यालय ते आदर्श अपार्टमेंटपर्यंत पदपथाची दुरूस्ती करणे.

**97 ते 99. श्री. विशाल पोपट ससाणे, यांजकडून :-**

**(97)** प्र.क्र. 82, जुईनगर सेक्टर 24 येथील वसुंधरा सोसायटी ते सुंदरम सोसायटीपर्यंत गटाराची व पदपथाची दुरूस्ती करणे. **(98)** प्र.क्र. 82, जुईनगर सेक्टर 24 ओमकार सोसायटी ते पंचरत्न सोसायटीपर्यंत गटाराची व पदपथाची दुरूस्ती करणे. **(99)** प्र.क्र. 82 मधील ओमकार, महालक्ष्मी, पंचरत्न व सिध्दीविनायक सोसायटी समोरील रस्त्याचे काम करणे.

**100 व 102. श्रीम. तनुजा श्रीधर मढवी, यांजकडून :-**

**(100)** प्र.क्र. 83, जुईनगर येथील गावदेवी मैदानाच्या कुंपणाच्या दगडी भिंती उंदरांनी पोखरलेल्या आहेत त्या काढून तेथे आर.सी.सी. पाया बनवुन व ग्रिल काढून तेथे वीटकाम करण्यात यावे व कुंपणाच्या बाजुने सुशोभिकरण करणे. **(101)** प्र.क्र. 83, जुईनगर येथे स्वच्छता राखण्यासाठी रस्त्यावर कचरा टाकणे व फुटपाथवर डेब्रिज ठेवणे तसेच प्लास्टिकच्या पिशव्यांचा वापर यांना आळा घालण्यासाठी काही धोरणात्मक ठोस कार्यवाही करणे. **(102)** प्रभाग क्र. 83, जुईनगर येथील मोठ्या नाल्यात रासयनिक सांडपाण्यामुळे परिसरातील होणारी दुर्गंधी हटविण्यासाठी सदर नाल्यात 4 फुट व्यासाची पाईपलाईन टाकून त्यातुन बंदिस्तपणे रासायनिक सांडपाणी शेवटपर्यंत नेऊन नागरिकांना दुर्गंधी पासून मुक्त करावे.

**103 ते 105. श्रीम. नंदा कुंदन काटे, यांजकडून :-**
**(103)** प्र.क्र. 13, ऐरोली रेल्वे स्टेशन व बसस्थानकालगत असणाऱ्या पदपथालगत संरक्षक रेलिंग बसविणे. **(104)** प्र.क्र. 13, ऐरोली येथील अतिउच्च दाबाखालील जागा सिडको प्रशासनाकडून हस्तांतरित करून एका भागामध्ये उद्यान तर दुसऱ्या भागात मैदान विकसित करणे. **(105)** प्र.क्र.13, ऐरोली येथील मुख्य नाला बंदिस्त करून त्यावर हलक्या वाहनांकरिता रस्ता विकसित करणे.

**106 ते 108. श्री. अशोक अंकुश गावडे, यांजकडून :-**
**(106)** प्र.क्र.109 अंतर्गत सेक्टर 48अे मधील नवघरकूल को.हौ. सोसायटी, ओमप्रथमेश को.हौ.सोसायटी व सावळा हॉस्पीटलच्या समोरील भाग स्वच्छ व साफसफाई करून त्या ठिकाणी जॉगिंग ट्रॅक अथवा उद्यान बनविणे. **(107)** प्र.क्र. 109 अंतर्गत सेक्टर 44 येथील शिवरेज लाईन बदली करणे **(108)** प्र.क्र. 109 अंतर्गत सेक्टर 44 येथील एस.एस. हायस्कूलचे खेळाचे मैदान शाळेच्या वेळे व्यतिरिक्त स्थानिक मुलांना खेळण्यास देणे.

**109 ते 111. श्रीम. स्वप्ना अशोक गावडे, यांजकडून :-**
**(109)** प्र.क्र. 98 अंतर्गत सेक्टर 28 मध्ये प्लॉट क्रमांक 10 व 10अे मध्ये उद्यान बनविणे. **(110)** प्र.क्र. 98 अंतर्गत सेक्टर22 मध्ये प्लॉट क्रमांक 16 व 17,18 तसेच सेक्टर 40 मध्ये प्लॉट क्र. 39,40मध्ये भाजीपाला व फळमार्केट उभारणे. **(111)** प्र.क्र. 98 अंतर्गत सेक्टर 28 मध्ये प्लॉट क्रमांक 5अे आभ्यासिका उभारणे.

**112 ते 114. श्रीम. सुरेखा अशोक नरबागे, यांजकडून :-**
**(112)** नवी मुंबई महापालिकेने मुख्यालयात वैयक्तिक कामानिमित्त येणाऱ्या व देशभरात प्रेक्षणीय स्थळ म्हणून गौरविण्यात आलेल्या नमुंमपाच्या मुख्यालय परिसरात सायंकाळी व सुट्टीच्या दिवशी फेरफटका मारण्यासाठी येणाऱ्या जनतेसाठी आम्रमार्ग दिशेला तसेच पामबीच मार्गावर मुख्यालय परिसरात शोभेल अशा पध्दतीच्या सुंदर सुबक प्रसाधनगृहांची तरतूद करणे. **(113)** प्र.क्र. 103 च्या भौगोलिक क्षेत्रातील सेक्टर 8, सेक्टर 8ए व 8बी येथील बहुतांश पदपथ हे सिडकोने युसीआर पध्दतीने बांधलेल्या पावसाळी गटरांवर असून आज त्यांची दुरावस्था झाल्याने ते नागरीकांच्या जिवितास व मालमत्तेस धोकादायक ठरणारे असल्याने त्या गटारांची व पदपथांची पुर्नबांधणी करणे. **(114)** ठाणे पंचायत समिती व ठाणे जिल्हा परिषदेकडून सन 1990 मध्ये सेक्टर 8 मध्ये बांधलेल्या व्यायाम शाळेची दुरावस्था झालेली आहे. तरी जुन्या दुरावस्थेतील व्यायामशाळेच्या वास्तुच्या ठिकाणी नवी अद्यावत साधन सामुग्रीसह अशा व्यायाम शाळेची उभारणी करणे.

**115 ते 117. श्रीम.मनिषा शशिकांत भोईर, यांजकडून :-**
**(115)** ठाणे बेलापूर रोड वरील खैरणे एमआयडीसी येथील खैरणे फायर स्टेशन समोर बस थांबा शेजारी पदचारीचे सातत्याने अपघात जीवितहानी होत आहेत. अपघात जिवीतहानी रोखण्यासाठी भुयारी किंवा पदचारी पूल बांधणे. **(116)** ठाणे बेलापूर रोड वरील खैरणे एमआयडीसी ते सविता कंपनी पावणेपर्यंत पदचारी कामगारांना कंपन्या मध्ये कामावर जाण्यासाठी ठाणे बेलापूर रोड वरून चालत जावे लागते. त्यामुळे पदपथ नसल्यामुळे अनेक अपघात होत असतात. अपघात रोखण्यासाठी पदचारासाठी पदचारी मार्ग रस्त्याच्या दोन्ही बाजूनी निर्माण करणे.
**(117)** पावणेगाव येथून वाशी शहरात जाण्यासाठी प्रवासी, विद्यार्थी, कामगार यांना सध्या दुरवरून तुर्भे किंवा कोपरखैरणे येथील मार्ग वरून जावे लागते. दोन्ही अंतर लांब असल्यामुळे इंधन व वेळ वाया जाते. पावणेगांव एमआयडीसी क्षेत्रातील महत्त्वाचे गाव व मोठे छोटे शेकडो कारखाने असलेले विभाग असून वाशी शहरात जाण्यासाठी भुयारी किंवा सध्या असलेले उड्डाणपुलास जोडणारा मार्ग तयार करणे.

**118 ते 120. श्रीम.उज्वला विकास झंजाड, यांजकडून :-**
**(118)** प्र.क्र.01, ईश्वरनगर येथील विद्युतवायर भूमिगत करणे अत्यंत गरजेचे आहे. सदर वायर नागरिकांच्या घरावरून गेल्या असल्याने अनेक अपघात झाले असून 2 नागरिकांचा मृत्यु देखील झाला आहे. तरी विद्युत वायर भूमिगत करणे. **(119)** प्र.क्र. 01, ईश्वरनगर येथील रस्ते, पदपथ व गटारांची अत्यंत दुरावस्था झाली असून प्रभागातील उर्वरित रस्ते, पदपथ व गटारांची दुरूस्ती किंवा नव्याने बनविणे. **(120)** प्र.क्र. 01, ईश्वरनगर येथील नागरिकांची नागरी आरोग्य कैंद्र, पालिकेची शाळा, व्यायाम शाळा व इतर नागरी सुविधा अभावी प्रचंड गैरसोय होत असून सिडकोकडून गट क्रमांक 40 हा बहुउद्देशीय इमारतीकरिता पालिकेने हस्तांतरित करून त्या ठिकाणी बहुउद्देशीय इमारत बांधणे.

**121 ते 123. श्री. रामदास बबनराव पवळे, यांजकडून :-**
**(121)** प्र.क्र. 49, सेक्टर 12डी, रामनगर सेक्टर 9 व सेक्टर 10 येथील अंतर्गत रस्त्याचे नव्याने डांबरीकरण करणे. **(122)** प्र.क्र. 49, सेक्टर 9 व सेक्टर 10 येथे वाचनालय बनवून देणे. **(123)** प्र.क्र. 49, सेक्टर 12डी, रामनगर येथील तलावाचे सुशोभीकरण करणे.

**124 ते 126. श्री. चेतन प्रकाश नाईक, यांजकडून :-**
**(124)** प्र.क्र. 22, ऐरोली विभागातील दिवागांव मध्ये भाजीपाला मार्केट आणि मच्छी मार्केटसाठी से.8अ मध्ये आरक्षित भूखंड आहे. या भूखंडावर लवकरात लवकर मार्केट विकसित करणे. **(125)** प्र.क्र. 22, ऐरोली विभागातील दिवागांव मध्ये पाण्याचा दाब कमी असल्यामुळे नागरीकांना पाणी कमी मिळते. या दृष्टिकोणातून 24/7 तास पाणी पुरवठा सुरळीत होण्यासाठी दिवागांव तलावाच्या समोर पाण्याची टाकी बांधणे. **(126)** प्र.क्र. 22, दिवागांवातील कोळी-आगरी व इतर समाज मोठ्या प्रमाणात रहिवाशी आहेत. या समाजाचे विविध सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रम होत असतात. यासाठी दिवा गांवातील हनुमान मंदिराजवळील रिकामी जागा व मराठी शाळा या भूखंडावर बहुउद्देशिय इमारत बांधणे.

**127 ते 129. श्रीम. ऋचा रामचंद्र पाटील, यांजकडून :-**
**(127)** प्र.क्र. 79, सानपाडा सेक्टर 11 व मिलेनियम टॉवर मागील नाल्याचे सुशोभिकरण करून बाजूने जॉगिग ट्रॅक बनविण्यात यावे. तसेच जुईनगर स्टेशन समोरील नाल्याचे सुशोभिकरण करण्यात यावे व कडेच्या वरती हिरवळ लावणे. **(128)** प्र.क्र. 79, सानपाडा सेक्टर 9 मधील स्व. जानकीबाई शंकर पाटील चौक व मिलेनियम टॉवर शॉपींग सेंटर चौकाचे सुशोभिकरण करणे. **(129)** प्र.क्र. 79, मधील डी.व्ही.पाटील मास्टर उद्यान सेक्टर 10, सानपाडा येथे फुटबॉल गोलपोस्ट बनविणे.

**130 ते 132. श्री. निवृत्ती शंकर जगताप, यांजकडून :-**
**(130)** प्र.क्र. 29, घणसोली 2 या प्रभागांत सिडकोकडून महानगरपालिकेत हस्तांतरित झालेल्या नोड 21 मधील काही भाग हा माझ्या प्रभागात येत आहे. सेक्टर 21 मध्ये सिडकोने अजून मलनि:स्सारण वाहिन्या टाकल्या नाहीत. त्यामुळे प्लॉट नं.88 मधील पार्थ एन्कोव बिल्डींग पासून दक्षिणेकडे घणसोली गावा लगत प्लॉट नं. 10 पर्यंत असणाऱ्या चामुंडा अपार्टमेंट, कृष्णव्हिला अपार्टमेंट पर्यंत असणाऱ्या प्लॉट मध्ये बिल्डींग तयार झाल्या आहेत व तेथे मोठ्या प्रमाणात नागरिक राहत आहेत. या भागात मलनि:स्सारण वाहिन्या न टाकल्यामुळे येथील नागरिकांची मोठी गैरसोय निर्माण झाली आहे व आरोग्याचा प्रश्न हि निर्माण झाला आहे. त्याच प्रमाणे सेक्टर 22 मधील प्रभागात येणाऱ्या भागात सुध्दा हिच समस्या आहे. तरी लवकरात लवकर येथे नवी मुंबई महानगरपालिकेने मलनि:स्सारण वाहिन्या टाकणे. **(131)** प्र.क्र. 29, घणसोली 2 मध्ये येणाऱ्या सेक्टर 11 मधील प्लॉट नं. 88 मधील पार्थ एन्कोव बिल्डींग पासून दक्षिणेकडे घणसोली गावा लगत प्लॉट नं. 10 पर्यंत असणाऱ्या चामुंडा अपार्टमेंट, कृष्णव्हिला अपार्टमेंट पर्यंत असणाऱ्या सर्व प्लॉट मधील रस्ते व पावसाळी पाणी वाहून देणारी गटारे बांधणे. **(132)** प्र.क्र. 29, घणसोली 2 मध्ये सेक्टर 21 मधील प्लॉट नं. 85 हा गार्डनसाठी राखून ठेवला आहे. त्यास संरक्षण भिंत बांधणे.

**133 ते 135. श्री. मुनावर पटेल, यांजकडून :-**
**(133)** प्र.क्र. 55, खैरणे गांव येथे काही भागात जलवाहिनी जुन्या झाल्याने व काही जलवाहिनी लांब अंतरावर असल्याने पाणीपुरवठा कमी होतो व योग्य दाबाने पाणी मिळत नाही. निशांत व्हिडीओ सेंटर ते खैरणे फुट ब्रिज पर्यंत नवीन जल वाहिनी टाकणे. **(134)** प्र.क्र. 55, खैरणे गांव येथील काही भागात गटाराची परिस्थिती अत्यंत खराब झालेली आहेत. गटारात जागोजागी पाणी थांबत आहे, पाण्याचा निचरा होत नाही, व गटाराचे काही भाग तुटलेले आहेत. यामुळे पाणी पुढे जात नाही व परिसरात दुर्गंधी व रोगराई पसरत आहे. तरी नवीन आर.सी.सी. हेवी ड्युटी गटार बांधणे. **(135)** प्र.क्र. 55, खैरणे गांव येथे काही भागात मलनि:स्सारण वाहिन्या अद्याप टाकण्यात आलेल्या नाहीत. नागरिकांनी सांडपाण्याच्या लाईन गटारात सोडलेल्या आहेत. सांडपाण्याचा निचरा होत नाही, परिसरात दुर्गंधी व रोगराई पसरत आहे. लोकसंख्या वाढल्याने सांडपाणी तुंबत आहे व दररोज मल मिश्रित पाणी रस्त्यावर पसरत आहे व कधी कधी पिण्याच्या पाण्यात एकत्र होत आहे. तरी नवीन मलनि:स्सारण वाहिनी टाकणे.

**136 ते 138. श्रीम. रूपाली किस्मत भगत, यांजकडून :-**
**(136)** प्र.क्र. 96, नेरूळ, सेक्टर 16A, शाळा क्रमांक 8 व 9 समोरील पदपथावर पालकवर्गाला बसण्याकरिता आकर्षक बेचेंस बसविणे. **(137)** प्र.क्र. 96, नेरूळ सेक्टर 16A येथील भूखंड क्रमांक 69A वर लवकरात लवकर वाहनतळ उभारणे. **(138)** प्र.क्र. 96, नेरूळ सेक्टर 18 येथील भूखंड क्रमांक 15 येथील इमारतीमध्ये सुरू असलेल्या मार्केट, ग्रंथालय व अभ्यासिका येथे सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बसविणे.

**139 ते 141. श्रीम.वैशाली तुकाराम नाईक, यांजकडून :-**
**(139)** प्र.क्र. 51, कोपरखैरणे नोडमध्ये प्रत्येक ठिकाणी नागरिकांच्या सोईसाठी दिशादर्शक फलक लावणे. **(140)** प्र.क्र.51, कोपरखैरणेमध्ये जेष्ठ नागरिकांना विश्रांतीसाठी निवाराशेड करणे. **(141)** प्र.क्र. 51, कोपरखैरणे ठाणे जनता बँक ते महाराष्ट्र कॉर्पोरेशन बँकपर्यंत हेव्ही ड्युटी गटार करणे.

**142. श्रीम. उषा कृष्णा पाटील, यांजकडून :-**
सिडको उपक्रमातून शहरातील व्यावसायिक तसेच निवासी वापराच्या मोकळ्या जागा संपूर्णत: व्यापारी तत्वाने लिलाव पध्दतीने विकण्यात येतात. तसेच सिडको उपक्रमाकडून शहरातील रेल्वे स्टेशन इमारत व मोकळ्या परिसराचा वापर विविध प्रकारचया व्यावसायिक कारणास्तव करण्याबरोबरच रेल्वे प्रवाशांकडून अधिभार वसूल केला जात आहे. हे लक्षात घेतल्यास सिडको उपक्रम ही एक व्यावसायिक संस्था ठरते. त्यामुळे नवी मुंबई महानगरपालिका ज्याप्रमाणे माथाडी अथवा अन्य प्रवर्गाच्या सहकारी संस्थाच्या ताब्यातील बांधकाम विरहीत मोकळ्या भूखंडाच्या संदर्भाने मालमत्ता कराची वसूली करते त्याच नियमाने आज सिडकोच्या स्वामित्व अधिकारातील नवी मुंबईतील सर्व मोकळ्या भूखंडाच्या संदर्भाने मालमत्ता कराची पुर्वलक्षी तत्वाने थकबाकीसह वसूली करणे.

**143. श्री. ममित विजय चौगुले, यांजकडून :-**
प्र.क्र. 23, ऐरोली सेक्टर 9 येथील ब्रिज व्हिव्ह सोसायटी समोर पावसाळी गटाराची दुरूस्ती करणे.

**144 ते 146. श्रीम. संगीता संदीप म्हात्रे, यांजकडून :-**
**(144)** प्र.क्र. 45, मधील मुख्य रस्ता "राजधानी" स्विट्स समोर तसेच से. 06 "रोहीत" मसाला समोर हायमास्ट बसविणे. **(145)** प्र.क्र. 45, मधील सर्व प्रमुख रस्त्यांवरील पदपथावर लोखंडी रेलिंग बसविणे. **(146)** प्र.क्र. 45, मधील से.6, रूम नं. 425 व 426 च्या बाजूला जेष्ठ नागरिक निवारा शेड बांधणे.

**147 ते 149.श्रीम. सलुजा संदीप सुतार, यांजकडून :-**
**(147)**प्रभाग क्र. 99, अंतर्गत सेक्टर 27 येथे एक ही सार्वजनिक शौचालयाची व्यवस्था नसल्यामुळे येथे मध्यवर्ती ठिकाणी सार्वजनिक शौचालय बांधणे. **(148)** प्रभाग क्र. 99, अंतर्गत सेक्टर 25 येथील सामाजिक उपक्रमासाठी राखीव असलेल्या भूखंडावर बहुउद्देशिय बांधण्यात यावे. **(149)** प्रभाग क्र. 99, अंतर्गत सेक्टर 23B येथील सर्व रस्त्यांचे डांबरीकरण करणे.

**150 ते 152. श्री. रविंद्र उध्दव इथापे, यांजकडून :-**
**(150)** उरणफाटा, नेरूळच्या ब्रीजखाली वाहनव्यवस्था सुरळीत होणेसाठी सर्कल व्यवस्था करणे. **(151)** वंडर्सपार्क व आम्रमार्गलगतचे डी-बेल्टची गार्डनद्वारे सुधारणा करणे. **(152)** नवदुर्गा सोसायटी ते वंडर्सपार्क नाल्यालगतच्या रस्त्याचे काम करणे.

**153 ते 155. श्री. सुनील बाळाराम पाटील, यांजकडून :-**
**(153)** प्रभाग क्र. 92 येथील नागेश्वर तलावामध्ये दारावेगांव तसेच नेरूळ परिसरातील गणपती विसर्जन व दुर्गामाता विसर्जन मोठ्या प्रमाणात होत असते. तलावातील गाळ बऱ्याच वर्षापासून न काढल्याने गाळाचे प्रमाण फार वाढले आहे. परिणामी पाणी दुर्षित घेऊन दुर्गंधी येत आहे. त्यामुळे परिसरातील नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण होत आहे म्हणून नागेश्वर तलावातील गाळ काढून सुशोभित करणे.

**(154)** प्रभाग क्र 92 येथे सिवुड दारावे हे ऐतिहासिक रेल्वे स्थानक तयार होत आहे. त्या स्थानकासमोर नेरूळ से. 21,23 येथे राणी लक्ष्मीबाई चौक आहे. ज्याप्रमाणे वाशी येथे शिवाजी चौकात शिवाजी महाराजांचा घोड्यावर बसलेले आरूढ पुतळा आहे. तसाच राणी लक्ष्मीबाई चौकामध्ये घोड्यावर बसलेल्या राणी लक्ष्मीबाईचा आरूढ पुतळा बसविणे. **(155)**प्रभाग क्र. 92 दारावे येथे भाजी विक्रेते, फळ विक्रेते, मासळी विक्रेते मंडई नसल्याने रस्त्यावर, पदपथावर बसत असतात. सिडकोने सदर परिसरासाठी भूखंड क्र. 60, स्मशानभूमी जवळ राखीव ठेवलेला आहे. सदर भूखंड हस्तांतरीत करून त्या ठिकाणी सुसज्ज मंडई व लग्नकार्यासाठी सभागृह बांधणे.

**156 ते 158.श्री. द्वारकानाथ बाबु भोईर, यांजकडून :-**

**(156)** प्रभाग क्र. 30 मधील घणसोली सेक्टर 15 येथील फुटपाथ दुरूस्तीचे काम करणे व साईराज सर्कल ते मुरबादेवी चौक या रस्त्यावर पददिव्यांची सोय करणे. **(157)** प्रभाग क्र. 30, घणसोली मधील वैशाली बिल्डिंग ते साईराज सर्कल (बसडेपो प्रवेशद्वारापर्यंत) या रस्त्याचे डांबरीकरण करणे. **(158)** प्रभाग क्र. 30, मधील कोळ्यांची आळी येथील शौचालयापासून हनुमान मंदिरापर्यंतच्या रस्त्याचे काम करणे.

**159 ते 161. श्रीम. श्रध्दा साजुराम गवस, यांजकडून :-**

**(159)** प्रभाग क्र. 94, नेरूळ सेक्टर 10 येथील पदपथ व रस्त्यांची दुरूस्ती करणे. **(160)** प्रभाग क्र. 94, नेरूळ सेक्टर 10 येथील अण्णसाहेब पाटील उद्यानाच्या भिंतीचे व ग्रीलचे काम करून कलर काम करणे. **(161)** प्रभाग क्र. 94, नेरूळ सेक्टर 10 मधील जय भवानी मार्केट व राजकमल मार्केटच्या दोन्ही बाजूच्या रस्त्यांचे डांबरीकरण करणे.

**162 ते 164.श्रीम. दिपाली सुरेश संकपाळ, यांजकडून :-**

**(162)** प्रभाग क्र. 35, घणसोली सेक्टर 9 घरोंदा वसाहती मधील ड्रेनेज लाईन खराब झाल्या असून नवीन ड्रेनेज लाईन करण्यात याव्यात, येथील पदपथ व रस्त्यांची दुरूस्ती करणे. **(163)** प्रभाग क्र. 35, मधील घरोंदा-सिम्पलेक्समधील रस्ते आणि पदपथांची सिडकोने गेल्या 15 वर्षात देखभाल न केल्यामुळे येथील रस्ते व पदथांची दुरावस्था झाली आहे. त्यामुळे नवी मुंबई महानगरपालिकेने जबाबदारीने प्रभाग क्रमांक 35 मधील दुरावस्था झालेल्या रस्त्यांची व पदपथांची तातडीने दुरूस्ती व पुर्नबांधणी करणे. **(164)** प्रभागामध्ये शहर नियोजन आराखड्यानुसार आरक्षित असलेल्या भूखंडावर सार्वजनिक आरोग्यलयाची उभारणी करणे.

**165 ते 167. श्रीम. मोनिका लक्ष्मीकांत पाटील, यांजकडून:-**

**(165)** नवी मुंबईच्या सांस्कृतिक क्षेत्रात ब्रास बँड वादन मानाचा तुरा समजला जातो. नवी मुंबईतील आगरी कोळी समाजातील युवकांनी त्यांच्या वडिलोपार्जित कला मानाने जोपासल्या आहेत. प्रत्येक गावागावामध्ये बँड पथके आहेत . विविध कार्यक्रमाव्दारे आपली कला साद करत असतात. महाराष्ट्रात सर्व स्थानिक संस्थेत तसेच पोलीस क्षेत्रात बँड पथकास मानाचे स्थान देवून स्वत:चे पथक तयार केलेले आहे. त्यामुळे ते विविध कार्यक्रम स्वत:चे पथक तयार केलेले आहे. त्यामुळे ते विविध कार्यक्रम स्वत:च्या बँडच्या माध्यमातून सादर करत असतात. त्याच धर्तीवर नवी मुंबई महानगरपालिकेनही स्वत:चे बँड पथक स्थापन करुन त्यामध्ये आगरी कोळी समाजातील संगीत क्षेत्राशी निगडीत असलेल्या युवकांना हक्काचे व्यासपीठ तयार करुन देणे.

**(166)** नवी मुंबई महानगरपालिकेमध्ये जेवढे ब्रास बँड पथक आहेत त्याचा सन्मान करुन गौरविण्यात यावे. **(167)** कला व क्रिडा समितीमार्फत ब्रास बँड पथकांना अनुदान देण्यात यावे त्यामुळे त्यामध्ये अनेक सुधारणा करण्यास त्यांना मदत होईल.

**168 ते 170. श्रीम. सुनिता रतन मांडवे, यांजकडून :-**

**(168)** प्रभाग क्रमांक 87 च्या भौगोलिक सीमा क्षेत्रातील मनपाच्या कैलासवासी श्री. ज्ञानेश्वर शेलार ग्रंथालय वाचनालय असलेल्या भूखंडावर अथवा वाचनालयाच्या इमारतीवर वाढीव बांधकाम करुन त्या ठिकाणी महिला सक्षमीकरण केंद्राची उभारणी करणे. **(169)** प्रभाग क्रमांक 87 मधील सेक्टर 8 येथील प्रभागात हौसिंग सोसायटी लगतच्या रस्त्यावर पदपथ नसल्याने वाहनांच्या अतिवर्दळी मुळे नागरीकांच्या जिवितास धोकादायक ठरणारी परिस्थिती निर्माण झाली असल्याने या परिसरात पदपथाची उभारणी करणे. **(170)** प्रभाग क्रमांक 87 मधील 20 वर्षापेक्षा जुन्या असलेल्या भारतरत्न डॉ. बाबबासाहेब आंबेडकर पादचारी पुलाची दुरावस्था झालेली असून सदरचा पुल हा अरूंद असल्याने नागरीकांची मार्गक्रमण करताना विशेषत: महिला वर्गाची कुचंबणा होते हे लक्षात घेऊन सदरच्या पुलाच्या ठिकाणी नवीन पुलाची उभारणी करणे.

**171 ते 173. श्रीम. उषा पुरुषोत्तम भोईर, यांजकडून :-**

**(171)** प्रभाग क्रं. - 56, कोपरीगाव, येथील हनुमान मंदिर भुखंड क्रं - 12 येथील हेव्हीडयुटी गटर बांधणे. **(172)** कोपरीगाव, प्रभाग क्रं. - 56 येथील गणेश पाटील घरापासून ते भवानी मंदिर पाच रस्ता पर्यंत हेव्हीडयुटी गटर बांधणे. **(173)** कोपरीगाव, प्रभाग क्रं. - 56 येथील रस्ता, उदयान चौक, तलाव शाळा मंदिर मार्ग व दिशा फलक लावणे.

**174 ते 176. श्री. गिरीश कानहा म्हात्रे, यांजकडून :-**

**(174)** प्रभाग क्र. 95, येथे काही भागात जलवाहिनी जुन्या झाल्याने पाणीपुरवठा योग्य दाबाने होत नाही. तरी नवीन जलवाहिनी टाकणे. **(175)** प्रभाग क्र. 95 येथे काही भागात मलनि:स्सारण वाहिन्या अद्याप टाकण्यात आलेल्या नाहीत. नागरिकांनी सांडपाण्याच्या लाईन गटारात सोडलेल्या आहेत. परिसरात रोगराई व दुर्गंधी पसरत आहे. लोकसंख्या वाढल्याने सांडपाणी तुंबत आहे व कधी कधी पिण्याच्या पाण्यात एकत्र होत आहे. तरी नवीन मलनि:स्सारण वाहिनी टाकणे. **(176)** प्रभाग क्र. 95 येथे काही ठिकाणी जेष्ठ नागरिकांना बसण्याकरीता बँचेस बसविणे.

**177 श्री. जयाजी के. नाथ, यांजकडून:-**

प्रभाग क्र. 104, मधील आर्टिस्ट व्हिलेजकडून येणारा मध्यवर्ती नाला व त्या नाल्याच्या बाजूस रमाबाई झोपडपट्टीतून येणारे सांडपाणी हे संपूर्ण ह्या मध्यवर्ती डासांचा होणारा प्रादुर्भाव थांबवावा हा नाला से. 4, 5, 6 आणि 8बी, कल्पतरू सोसायटी ते गुरूद्वारापासून नाल्यात येत असून त्यामुळे दुर्गंधी व सतत होणारे प्रदुषण तसेच हायवे पर्यंतच्या नाल्याची दुरूस्ती करून नाला वाहता ठेवावा व दोन्ही बाजूच्या भिंतींची दुरूस्ती करून सुशोभिकरण करणे.

**मा. महापौरांच्या आदेशावरून,**

**सही/-**
**(चित्रा बाविस्कर)**
**महानगरपालिका सचिव,**
**नवी मुंबई महानगरपालिका.**

**महापालिका सचिव कार्यालय,**
**नवी मुंबई महानगरपालिका,**
**दिनांक 07 फेब्रुवारी 2017.**